स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद – कर्मवीर





रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस, जि. सांगली

## अर्थशास्त्र विभाग

दि. 28 एप्रिल, 2022.

## युवा ऊर्जा मेळावा

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) यांच्या भव्य प्रांगणात महाविद्यालयामार्फत बुधवार दि. 28 एप्रिल 2022 रोजी युवा ऊर्जा मेळाव्याचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना व्यवसाय कसा करावा याचे प्रथमदर्शनी प्रात्यक्षिकासह ज्ञान देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाने सदरचा उपक्रम राबविला होता. कार्यक्रमाची सुरूवात मा. श्री. महेंद्र (आप्पा) लाड, मा. श्री. जे. के. (बापू) जाधव, बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्य उपस्थितीत झाली. या युवा ऊर्जा मेळाव्यामध्ये विभागाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विभागाच्या विद्यार्थ्यांनी सदरच्या युवा ऊर्जा मेळाव्यामध्ये महाविद्यालयाने देवू केलेल्या स्टॉल क्रमांक 9 मध्ये थाली–पीठ, वडा–पाव, सोलकडी यासारखे चविष्ठ पदार्थ माफक दरामध्ये विक्रीसाठी ठेवले होते. तसेच अर्थशास्त्र विषयाची ओळख स्टॉलला भेट देणाऱ्या सर्व व्यक्तींना होण्यासाठी स्टॉलच्या तीन्ही बाजूंना अर्थशास्त्र विषयाशी निगडीत फ्लेक्स लावले होते. सदरच्या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या अंगी एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. सदरच्या कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर स्टाफ, महाविद्यालयाच्या शेजारील शाळेचे विद्यार्था व स्टाफ आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

**फलनिष्पत्ती :**

1. सहभागी विद्यार्थ्यांना प्राथमिक व्यावसायिक ज्ञान प्राप्त झाले.
2. सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांना खरेदीविषयक व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन झाले.

**लाभार्थी : 79**





स्टॉलला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफ यांची भेट





स्टॉलला शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ यांची भेट

for Head,
Department of Economics
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.